**ठळक बातम्या**

- आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला दिलेल्या आर्थिक मदतीवर पुनर्विचार करावा असं संरक्षण मंत्र्यांचं आवाहन, भुज इथं हवाई दलाच्या जवानांशी साधणार संवाद

- पाकिस्तानने दहशतवादी गटांना आर्थिक सहकार्य केल्याची पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांची कबुली

- चालू आर्थिक वर्षात देशाचा विकासदर सहा पूर्णांक तीन दशांश टक्के राहण्याचा संयुक्त राष्ट्रांच्या अहवालातील अंदाज

**आणि**

- पंजाब नॅशनल बँक घोटाळ्यातील आरोपी निरव मोदी याचा जामीन अर्ज लंडन उच्च न्यायालयाने फेटाळला

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला दिलेल्या आर्थिक मदतीवर त्यांनी पुनर्विचार करावा असं आवाहन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. ते आज भुज इथल्या वायुसेना तळावर जवानांना संबोधित करत होते. नाणेनिधीने दिलेल्या मदतीचा मोठा भाग दहशतवादी कारवायांवर खर्च होण्याची शक्यता असल्याचं त्यांनी सांगितलं. ऑपरेशन सिंदूर मधल्या वायुसेनेच्या सहभागाची त्यांनी प्रशंसा केली तसंच या प्रतिहल्ल्याचं देशभरात आणि जागतिक स्तरावर कौतुक होत आहे, असं ते म्हणाले. २००१ च्या भुज भूकंपात ज्यांनी आपले प्राण गमावले त्यांच्या स्मरणार्थ बांधलेल्या स्मृतीवन या स्मारकाला राजनाथ सिंह भेट देणार आहेत.

राजनाथ सिंह भारत-पाकिस्तान सीमा प्रदेशालाही भेट देणार आहेत. यावेळी ते भारतीय लष्कराच्या कारवाई करण्याच्या तयारीचं परीक्षण करतील. भारत-पाकिस्तान तणावाच्या वेळी पाकिस्तानं भुज वर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे संरक्षण मंत्र्यांची ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.

<><><><><>

पाकिस्तानने दहशतवादी गटांशी थेट संबंध ठेवून त्यांना आर्थिक सहकार्य केल्याचं पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ यांनी एका ब्रिटिश वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत कबूल केलं आहे. पहलगाम मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ही कबुली देण्यात आल्यामुळे प्रादेशिक अस्थिरतेत पाकिस्तानच्या सहभागाबद्दल चिंता व्यक्त होत आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं लष्कर-ए-तैयबासारख्या दहशतवादी गटांशी पाकिस्तानच्या संबंधांची तपासणी केली आहे. जागतिक पातळीवर पाकिस्तानचं दहशतवादाला खतपाणी घालण्याचं धोरण उघडकीस आणण्यासाठी भारतानं सतत प्रयत्न केले आहेत. हाफिज सईद आणि झाकी-उर रहमान लखवीसह अनेक दहशतवादी पाकिस्तानात आश्रयास असून या व्यक्ती तसंच लष्कर-ए-तैयबा आणि जमात-उद-दावासारख्या संघटना संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या निर्बंध यादीत समाविष्ट झाल्या आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय समुदायानं या मुद्द्याला मान्यता दिली आहे, हे अधोरेखित झालं आहे.

<><><><><>

पाकिस्तानला एक अब्ज डॉलरची मदत देण्यापासून अमरिकेने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला न रोखल्याबद्दल अमेरिकेचे माजी संरक्षण अधिकारी मिशेल रुबीन यांनी टीका केली आहे. पाकिस्तान हा सर्वात भ्रष्टाचारी देश असून दहशतवाद हेच त्यांचं धोरण आहे, अशी टीका रुबीन यांनी केली. नाणेनिधीने पाकिस्तानला मदत केल्याचा फायदा अप्रत्यक्षपणे चीनला झाल्याचं त्यांनी सांगितलं. पाकिस्तानस्थित

दहशतवाद्यांनी भारतात हल्ला केल्याच्या पार्श्वभूमीवर निधी देणं हे निषेधार्ह असून भारत-पाकिस्तानमधील तणाव दूर करण्याच्या डोनाल्ड ट्म्प यांच्या धोरणाच्या हे विरोधात आहे, असंही रुबीन म्हणाले.

<><><><><>

जम्मू काश्मीरच्या जम्मू विभागातल्या सध्या बंद असलेल्या सर्व खाजगी आणि सरकारी शाळा येत्या १९ मे रोजी उघडणार असल्याचं जम्मूच्या शालेय शिक्षण संचालनालयाने जाहीर केलं आहे. शाळांच्या प्रशासनाने सर्व सुरक्षा नियमांचं पालन करणं आवश्यक असल्याची सूचना संचालनालयाने क्षेत्रीय शैक्षणिक अधिकाऱ्यांना दिली असून शाळांनी स्थानिक प्रशासनाच्या आणि पोलिसांच्या मदतीने कामकाज सुरळीत करावं असं या सूचनेत नमूद केलं आहे. डोडा, किश्तवार, रियासी आणि रामबन मधल्या शाळा १३ मे पासून सुरु झाल्या होत्या, तर सीमावर्ती जम्मू, सांबा, कठुआ, राजौरी, पूंछ आणि उधमपूरमधल्या अनेक शाळा कालपासून सुरु झाल्या आहेत.

<><><><><>

सीमा सुरक्षा दलाचे महासंचालक दलजित सिंग चौधरी यांनी काल जम्मूच्या सीमावर्ती भागाला भेट दिली आणि ऑपरेशन सिंदूरमध्ये अमूल्य योगदान देणाऱ्या जवानांच्या धैर्याची प्रशंसा केली. अमर पहाडी इथल्या युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून त्यांनी शहिदांना आदरांजली वाहिल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सिक्कीमच्या राज्य स्थापना दिनानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. असीम निसर्ग सौंदर्य, समृद्ध सांस्कृतिक परंपरा यासाठी सिक्कीम नेहमीच कौतुकास पात्र ठरला असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. सिक्कीम राज्यानं

निसर्गाशी एकरूप होत  शाश्वत विकास साधण्याचं अनोखं उदाहरण स्थापित केलं, असंही त्या म्हणाल्या.

मेहनती लोकांचं राज्य असलेल्या सिक्कीमनं विविध क्षेत्रात प्रगती केली आहे, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. नागालँडचे राज्यपाल ला गणेशन यांनीही सिक्कीमच्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

जागतिक बाजारात मिळणाऱ्या संमिश्र संकेतांच्या पार्श्वभूमीवर आठवड्याच्या शेवटच्या दिवशी आज शेअर बाजारात  घसरण दिसून आली. सुरुवातीच्या व्यवहारात आयटी, वित्तीय सेवा आणि औषध क्षेत्रात विक्री दिसून आली. सकाळी साडे नऊच्या दरम्यान  सेन्सेक्स २३१ पूर्णांक ६४ शतांश  अंकांनी घसरून ८२ हजार २९९ अंकांवर  सुरु झाला.  तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ४९ पूर्णांक ९५ शतांश  अंकांनी घसरून २५ हजार ०१२ अंकांवर  व्यवहार करत होता.

**<><><><><>**

भारत ही जगातली जलदगतीनं वाढणारी मोठी अर्थव्यवस्था असून चालू आर्थिक वर्षात देशाचा विकासदर सहा पूर्णांक तीन दशांश टक्के राहण्याचा अंदाज संयुक्त राष्ट्रांच्या ताज्या अहवालात वर्तवला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक आर्थिक स्थिती आणि शक्यता याविषयी तयार करण्यात आलेल्या मध्यवर्ती अहवालामध्ये हे निरीक्षण नोंदविण्यात आलं आहे. जागतिक अर्थव्यवस्था सध्या अस्थिर परिस्थितीचा सामना करत आहे. त्यामुळे यामध्ये काहीसा फरक होऊ शकतो, असंही त्यामध्ये नमूद करण्यात आलं आहे. यामध्ये अपेक्षित असलेली वाढ ही खासगी खरेदीदारी आणि सार्वजनिक गुंतवणुकीद्वारे होण्याची शक्यता आहे, असं संयुक्त राष्ट्रांच्या वरिष्ठ अर्थतज्ञ इन्गो पिटरले यांनी सांगितलं. भारताचा विकासदर पुढील वर्षी थोडा वाढून ६ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. याउलट जागतिक विकासदर २०२५ मध्ये फक्त २ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांपर्यंत

राहण्याचा अंदाज आहे, व्यापार तणाव आणि धोरणात्मक अनिश्चितता यामुळे हा दर कमी राहणार आहे.

**<><><><><>**

लंडनमधल्या तुरुंगात असलेला हिरे व्यापारी निरव मोदी याचा जामीन अर्ज लंडन उच्च न्यायालयाने फेटाळला आहे. भारतातल्या पंजाब नॅशनल बँकेतल्या १३ हजार कोटी रुपयांच्या  घोटाळ्यात सामील असलेल्या निरव मोदी याने त्याच्या प्रत्यार्पणावर निर्णय होईपर्यंत जामीन मिळण्यासाठी लंडन उच्च न्यायालयात काल अर्ज दाखल केला होता. भारतातर्फे काम पाहत असलेल्या वकिलांनी आणि त्यांना साहाय्य करत असलेल्या सीबीआय च्या पथकाने त्यावर जोरदार हरकत घेतली आणि अखेरीस न्यायालयाने तो जामीन अर्ज फेटाळला आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचा सन्मान, आणि शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी भाजपातर्फे देशभरात तिरंगा यात्रा सुरु आहे. २३ मेपर्यंत ही यात्रा सुरू राहणार आहे.

नागपूरच्या कामठी तहसीलमध्ये  आज राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे  यांच्या उपस्थितीत तिरंगा यात्रा काढण्यात आली. यात्रेच्या सुरुवातीला बावनकुळे यांनी मुख्य चौकात  डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना दिली. देशातली १४० कोटी  आणि महाराष्ट्रातली  १४ कोटी जनता ही  भारतीय सैन्याच्या पाठीशी आहे, असं ते यावेळी म्हणाले.

**होल्ड ---बाईट बावनकुळे**

**सोलापूर** शहरात देखील  आज  सकाळी साडेनऊ वाजता तिरंगा रॅली काढण्यात आली.  पालकमंत्री तथा राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते अशोक चौकातल्या  स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून या

रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. **लातूर** जिल्ह्यातल्या उदगीर इथंही भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली. **उदगीर** शहरातल्या छत्रपती शाहू महाराज चौकापासून सुरू झालेल्या या यात्रेचा समारोप शहिद कॅप्टन कृष्णकांत चौकात झाला.

<><><><><>

जगातलं पाचवं सर्वात उंच शिखर असलेल्या माऊंट मकालू सर केल्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी इंडो तिबेटियन सीमा पोलिसांचं अभिनंदन केलं. जवानांनी शिखरावर तिरंगा ध्वज फडकावला, तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून प्रेरणा घेत शिखरावर स्वच्छता अभियान राबवलं, अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यानी दीडशे किलो कचरा काढला असं गृहमंत्र्यानी सांगितलं. गृहमंत्र्यांनी जवानांच्या धाडसाचं कौतुक केलं.

<><><><><>

प्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक आकाश भास्करन यांच्या चेन्नई निवासस्थानी तसंच कार्यालयावर सध्या सक्त वसुली संचालनालयाची छापेमारी सुरु आहे. भास्करन यांनी डॉन पिक्चर्स संस्थेद्वारे अनेक लोकप्रिय चित्रपटाची निर्मिती केली आहे.

//<><><><><>//